**कृपया प्रसिध्दिसाठी** **6 मे 2009**

## संजय निरुपम यांना अटक करण्याची राम नाईक यांची मागणी

**मुंबई, बुधवार :** "उत्तर मुंबईतील समता नगर पोलिसांनी उघड-उघड पक्षपात चालविला असून निवडणूक काळात पैसे वाटप केल्याचा अजामीनपात्र गुन्हा काँग्रेसचे उमेदवार श्री. संजय निरुपम यांच्याविरुद्ध नोंदविण्यात आला असतानाही त्यांना अद्याप मोकळेच ठेवले आहे. श्री. निरुपम यांना तात्काळ अटक करण्यात यावी," अशी मागणी भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबईतील उमेदवार श्री. राम नाईक यांनी केली आहे. नागरिकांसह भाजपा, शिवसेना व मनसे कार्यकर्त्यांनी केलेल्या गंभीर तक्रारीनंतरही पोलिसांनी श्री. निरुपम व उत्तर मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. अशोक सुत्राळे यांना अटक केली नाही. मात्र त्या दोघांनी त्यानंतर केलेल्या तक्रारीवरुन मूळ तक्रार करणा-यांनाच अटक केली आहे," अशी तक्रार पोलीस आयुक्त श्री. हसन गफूर यांच्याकडे एका पत्राद्वारे श्री. राम नाईक यांनी केली आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना श्री. नाईक म्हणाले,"29 व 30 एप्रिलच्या मध्यरात्री उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील काँग्रेसचे उमेदवार श्री. संजय निरुपम व काँग्रेसचे उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष ॲड. अशोक सुत्राळे आपल्या साथीदारांसह पैसे वाटताना दिसल्यामुळे लोखंडवाला कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व जवळील म्हाडा कॉलनीतील नागरिकांच्यात संताप निर्माण झाला होता. पैसे वाटपापासून थांबवित असताना गडबड-गोंधळ माजला. त्यातच श्री. निरुपम यांच्या अंगरक्षकाने हवेत गोळीबार केला. स्थानिक कार्यकर्त्यांनी समता नगर पोलीस ठाण्यात तक्रार क्र. 128/09 नोंदविली. खरं तर या तक्रारीनंतर पोलिसांनी श्री. निरुपम व ॲड. सुत्राळे यांना शोधून तात्काळ अटक करायला हवी होती. परंतु पोलिसांनी या तक्रारीकडे साफ दुर्लक्ष केले. त्यानंतर तासा-दोन तासांनी येऊन श्री. संजय निरुपम यांनी तक्रार क्र. 129/09 नोंदविली."

दोन्ही तक्रारींमध्ये आरोपींना अटकेची तरतूद आहे. मात्र पोलिसांनी श्री. निरुपम यांच्याविरुद्ध अगोदरची तक्रार अजामीनपत्र असूनही त्यांना अद्यापही अटक केली नाही, उलट पक्षी श्री. निरुपम यांची उशिरा तक्रार असूनही भाजपा-शिवसेनेच्या चार स्थानिक कार्यकर्त्यांना अटक केली. हा सरळ-सरळ पक्षपात आहे, असे प्रतिपादन श्री. राम नाईक यांनी केले आहे. या स्वरुपाची तक्रार श्री. नाईक यांनी पोलीस आयुक्त श्री. हसन गफूर यांच्याकडे केली असून श्री. संजय निरुपम व ॲड. अशोक सुत्राळे यांच्या अटकेची मागणीही केली आहे. या प्रकरणाकडे उत्तर मुंबई मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. बळीराम पवार यांचेही लक्ष वेधण्यात आले आहे.

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्धि प्रमुख**
**भ्रमणध्वनी : 9867689540**